Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278,
http://www.srjis.com/issues_data?issueId=215
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL, JUNE-JULY 2023, VOL-11/58

# महाविद्यालय स्वायत्तता: एक गुणात्मक संधी

डॉ. अतुल प्र.कुलकर्णी

सहायक प्राध्यापक शिक्षणशास्त्र विभाग म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतामध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, विद्यापीठे ही मोजकीच होती. हंटर कमिशनच्या शिफारशीनुसार काही संस्था उभ्या राहिल्या. परंतु तरीसुद्धा हे शिक्षण देणाऱ्या संस्था अत्यंत तोकड्या होत्या. भारत स्वतंत्र झाल्यावर 1949 सालच्या डॉक्टर राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या शिफारशीनुसार भारतात उच्च शिक्षणाच्या सोयी वाढत गेल्या. मात्र तोपर्यंत शालेय शिक्षणात सुद्धा हवा तेवढा प्रसार झाला नव्हता. त्यामुळे शालेय स्तरातून शिक्षण पूर्ण करणारे व त्यानंतर पुन्हा उच्च शिक्षणाला जाणारे यांचे प्रमाण कमी होते.

विद्यापीठांची संख्या 2013 -14 मध्ये 723 इतकी होती. या महाविद्यालयांना विद्यापीठाची संलग्नता मिळाली व त्या विद्यापीठांशी संलग्नित राहून महाविद्यालय काम करू लागली. या विद्यापीठ/ महाविद्यालयांमधून कला, वाणिज्य, विज्ञान यासारख्या पारंपारिक अभ्यासक्रम व नंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, विधी, औषध निर्माण, शिक्षणशास्त्र, यासारख्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांची सुरुवात झाली व त्यांची संख्याही झपाट्याने वाढली. या विद्यापीठांमध्ये विविध अभ्यासक्रमांची अभ्यास मंडळे तयार झाली.

अभ्यासक्रम तयार करणे, परीक्षा पद्धती ठरविणे अशा प्रकारची शैक्षणिक विकासाची कामे केली जाऊ लागली. या अभ्यासमंडळात त्या संबंधित विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये जेवढे महाविद्यालय येत, त्यात मग शहरी, ग्रामीण व आदिवासी या सर्व स्तरातून आलेले विद्यार्थी या सर्वांचा एकत्रित विचार करायला सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणजे शहरी, ग्रामीण, आदिवासी सर्व क्षेत्रासाठी अभ्यासक्रम एकच प्रकारचा ठेवला जाऊ लागला.

डॉ.कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार शालेय शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. परिणामतः उच्च शिक्षणात येणाऱ्यांचे प्रमाण वाढले. त्या प्रमाणात महाविद्यालयांची संख्याही वाढली. नंतरच्या काळात खाजगी विना अनुदानित पारंपारिक तसेच व्यवसायिक शिक्षण दिणाऱ्या उच्च शिक्षणसंस्थाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. याचे परिणाम म्हणजे विद्यापीठावरील ताण वाढत गेला. त्यामुळे या सर्व महाविद्यालयांशी संपर्क ठेवणे, त्यांचे गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे गुणवत्ता सुधारणे, त्यांच्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे, निकाल लावणे या सगळ्याच गोष्टींचा ताण वाढत गेला. याचा परिणाम म्हणजे वेळही जास्त जाऊ लागला. म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्त महाविद्यालयांची संकल्पना पुढे आणली.

जी महाविद्यालय अनेक वर्षापासून सुरू झालेली आहेत ज्यांना. नॅक अ श्रेणी मिळालेली आहे अशा महाविद्यालयांनी स्वायत्तता घ्यावी. हे विद्यापीठ अनुदान आयोगाने आवाहन केले. यानुसार महाविद्यालय स्वायत्तेसाठी अर्ज करू लागली. स्वायत्तता अंतर्गत तीन प्रकारच्या स्वायत्तता मिळू लागल्या. यामध्ये शैक्षणिक स्वायत्तता हा एक महत्त्वाचा भाग आहे.

शैक्षणिक स्वायत्तेमध्ये महाविद्यालयांना स्वतःचा अभ्यासक्रम स्वतः ठरवण्याची मुभा आहे. याचा परिणाम म्हणजे महाविद्यालयांना आत्तापर्यंत विद्यापीठाकडून आलेलाच अभ्यासक्रम

Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

राबविण्याची सक्ती होती. आता महाविद्यालयांमध्ये येणारा जो विद्यार्थी गट आहे, महाविद्यालयाचा परिसर आहे, महाविद्यालयाची जे उद्दिष्ट आहेत ,महाविद्यालयांचे ज्या ज्या औद्योगिक क्षेत्र ,सामाजिक क्षेत्रांबरोबर संलग्नीकरण केलेले आहे, त्या ठिकाणच्या गरजा महाविद्यालयांना माहिती आहेत, महाविद्यालयाकडे उपलब्ध सोयी सुविधा, यानुसार अभ्यासक्रम तयार करणे सोपे जाऊ लागले. अभ्यासक्रमामध्ये नवीन नवीन संकल्पना आणता येणे, यासाठी विद्यापीठावर अवलंबून राहायची गरज राहिली नाही.

हे अभ्यासक्रम ठरविताना औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, सामाजिक क्षेत्रामधील प्रतिष्ठित व्यक्ती, माजी विद्यार्थी अशासारख्यांचा सहभाग घेऊन अभ्यासक्रम तयार करणे, अध्ययवत करणे अत्यंत सोपे जाऊ लागले. याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर तर होत गेला.

तसेच मूल्यमापन पद्धतीचाही स्वायत्त महाविद्यालयांना अधिक फायदा होऊ लागला. कारण आत्तापर्यंत संलग्नित महाविद्यालय असताना विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालयांसाठी जी काही पद्धती ठरविले जात होती त्याच पद्धतीप्रमाणे मूल्यमापन करावे लागत होते. आता यामध्ये महाविद्यालयांना; प्रत्येक विषयाचे स्वतंत्र स्थान आहे; प्रत्येक विषयाचे मूल्यमापन हे वेगवेगळ्या प्रकाराने करता येणे शक्य आहे. उदाहरणार्थ शास्त्र विषयांमध्ये प्रात्यक्षिक, प्रकल्प यावर आधारित जास्त भर देता येणे शक्य आहे. त्याचबरोबर मानव्यविद्याशाखा मध्ये चर्चासत्रे, प्रकल्प लेखन, अशा वेगवेगळ्या प्रकारांवर भर देता येणे शक्य आहे. यामुळे सर्वांगीण मूल्यमापन करणे सोपे जाऊ लागले. किंबहुना सर्वांगीण मूल्यमापन केलेले असल्याकारणाने जो काही आपण विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवत आहोत तो खरच त्याला कितपत समजलेला आहे हे तपासता येऊ लागले. अभ्यासक्रमांमधील एखादा भाग हा खूपच अवघड आहे असं वाटत असेल आणि मूल्यमापनामध्ये जर विद्यार्थ्यांनी यश मिळू शकत नसेल तर महाविद्यालयांना त्याबाबतीत पुन्हा एकदा पुनर्विचार करणे पण सोपे जात आहे. कारण त्यासाठी त्यांचे कुठेही परावलंबित्व राहिलेले नाही या सर्वांचे एकत्रित परिणाम म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर नक्कीच होत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग महाराष्ट्र शासन हे आता समूह विद्यापीठाची ही संकल्पना या ठिकाणी पुढे आणत आहेत याचाही विद्या महाविद्यालयांना नक्कीच फायदा होईल आणि महाविद्यालयांनी तो करून घ्यावा

--------